पि.२

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**सार्वजनिक आरोग्य खाते**
**सेठ ऐ. जे. बी, महानगरपालिका कान नाक घसा रुग्णालय**

**क्र.एच ओ/** 1283 **/ई एन टी दि.** 14 JUL 2025

**स्वारस्य अभिव्यक्ती सूचना**

विषय :- सार्वजनीक आरोग्य खात्यांतर्गत सेठ ऐ. जे. बी. महानगरपालिका कान नाक घसा रुग्णालय येथे रुग्णांना मानसेवी तत्वावर कान नाक घसा रोग सेवा प्रदान करण्यासाठी इच्छुक कान नाक घसा शल्यचिकित्सकांकडून स्वारस्य अभिव्यक्ती मागविणे.

सार्वजनीक आरोग्य खात्यांतर्गत सेठ ऐ. जे. बी. महानगरपालिका कान नाक घसा रुग्णालय येथे मानसेवी शल्यचिकित्सक २ पदे, मानसेवी सहाय्यक शल्यचिकित्सक ४ पदे निव्वळ कंत्राटी तत्वावर भण्यासाठी इच्छुक पात्र कान नाक घसा शल्यचिकित्सकांकडून खाली नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हता, अनुभव, मासिक मानधन व विहीत अटी आणि शर्तींसह अर्ज मागविण्यात येत आहेत.

**पदाचा कार्यकालः दि.१६.०८.२०२५ ते दि.३१.०३.२०२७**
**(कंत्राटी तत्वावर दर १७९ दिवसांनी १ दिवसाचा तांत्रिक खंड)**

| पदनाम | संख्या | प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| मानसेवी शल्यचिकित्सक | २ | खुला | मुंबई/महाराष्ट्र आरोग्य विज्ञान मान्यताप्राप्त विद्यापीठातून एमएस/डीएनबी (कान नाक घसा) | १. पदवीनंतर १० वर्षापेक्षा जास्त अनुभव.<br>२. सरकारी/निमसरकारी किंवा महानगरपालिका रुग्णालयात मानसेवी/सल्लागार म्हणून कान नाक घसा तज्ज्ञ सेवा प्रदान करण्याचा अनुभव. |
| मानसेवी सहाय्यक शल्यचिकित्सक | ४ | खुला | मुंबई/महाराष्ट्र आरोग्य विज्ञान मान्यताप्राप्त विद्यापीठातून एमएस/डीएनबी (कान नाक घसा) | १. पदवीनंतर ०५ वर्षापेक्षा जास्त अनुभव.<br>२. सरकारी/निमसरकारी किंवा महानगरपालिका रुग्णालयात मानसेवी/सल्लागार म्हणून कान नाक घसा तज्ज्ञ सेवा प्रदान करण्याचा अनुभव. |

★ **महत्त्वाच्या सूचनाः**

१) वरिष्ठ असलेल्या तीन अर्जदारांना युनिट प्रमुख पद दिले जाईल.

२) वरिष्ठ असलेल्या दोन अर्जदाराला मानसेवी शल्यचिकित्सक आणि इतरांना मानसेवी सहाय्यक शल्यचिकित्सक म्हणून पद दिले जाईल.

३) एमएस/डीएनबी पदवीनंतर १ वर्षापेक्षा जास्त काळ सेठ ऐ. जे. बी. महानगरपालिका कान नाक घसा रुग्णालयात काम केलेल्या उमेदवाराला प्राधान्य दिले जाईल.

**अर्ज प्रक्रिया :**

१) अर्जदाराने आपले अर्ज प्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रतीसहीत **दि. १५.०७.२०२५ ते दि. २५.०७.२०२५** पर्यंत सोमवार ते शुक्रवार (सार्वजनिक सुट्ट्या वगळून) रुग्णालयाच्या कार्यालयात सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावे.

२) कार्यालयातून चलन घेऊन अर्जदाराने अर्जाचे शुल्क रू.७९०/- + १८% GST महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रात (CFC) रोखीत भरावे व शुल्क भरल्याची पावती विहीत कालावधीत सादर करावी.

पि-५

**प्रमाणपत्रे** : १) एमएस/डीएनबी (कान नाक घसा) पदवी उत्तीर्ण व प्रयत्न प्रमाणपत्र
२) वैध एमएमसी नोंदणी प्रमाणपत्र
३) अनुभव प्रमाणपत्र
४) आधार कार्ड आणि पॅन कार्डची प्रत
५) प्रोफेशनल इंडेनमिटी (Professional Indemnity) प्रत

**वेतन** : परिपत्रक संचालक/वे.शि.प्र.रु./८२३३ दिनांक २५.०३.२०१४ नुसार दरमहा रु. १०,०००/.

**<u>सर्व साधारण अटी व शर्ती:-</u>**

१) सुट्टीचा दिवस आणि रविवार वगळता नियुक्त केलेल्या दिवसांनुसार मानसेवी तज्ञ यांनी आठवड्यातून ५ दिवस ४ तास काम करावे लागेल. सुट्टीचा दिवस रुग्णालय प्रमुख ठरवतील.

२) नियुक्त मानसेवी तज्ञ सेठ ऐ. जे. बी. महानगरपालिका कान नाक घसा रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभाग, शस्त्रक्रियागार विभाग आणि आंतर रुग्ण विभागात रुग्णांवर उपचार देतील.

३) मानसेवी तज्ञ हे रुग्णालयातील आवास अधिकारी व वरिष्ठ निवासी अधिकारी यांना प्रशिक्षण देतील.

४) युनिट अंतर्गत होणारे सर्व उपचार व शस्त्रक्रिया यासाठी सर्वस्वी जबाबदारी मानसेवी तज्ञांची राहतील.

५) मानसेवी तज्ञ यांनी त्यांच्या कर्तव्याच्या दिवशी हजेरी पत्रावर स्वाक्षरी करावी लागेल.

६) मानधन शुल्काचे पेमेंट संचालक/वे.शि.प्र.रु./८२३३ दिनांक २५.०३.२०१४ च्या परिपत्रकानुसार केले जाईल.

७) मानसेवी तज्ञ त्यांच्या सेवेच्या कालावधीत नैमित्तीक रजा अनूज्ञ नाही.

८) मानसेवी तज्ञची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात दि.१६.०८.२०२५ ते दि.३१.०३.२०२७ पर्यंत कंत्राटी तत्वावर दर १७९ दिवसांनी १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन नियुक्ती करण्यात येईल.

९) नियुक्त झालेला मानसेवी तज्ञ एकापेक्षा जास्त बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालयाच्या पदांवर राहू शकत नाही.

१०) सदर पदावरिल नियुक्ती भविष्यात कोणत्याही परिस्थितीमध्ये नियमित करण्यात येणार नाही. तसेच महानगरपालिका नियमित कर्मचा-यांना लागू होणारे बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियमन लागू होणार नाहीत आणि त्यासाठी ते न्यायालयात जाऊ शकत नाहीत.

११) कंत्राटी तत्वावरची नियुक्ती आवश्यकता नसल्यास कुठल्याही क्षणी संपुष्टात आणण्यात येईल.

१२) नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी पदधारकाने चुकीची माहीती प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याने किंवा कोणतीही माहीती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास तसेच कामगिरी असमाधानकारक आढळल्यास त्यांची नियुक्ती रद्दबादल करण्यात येईल.

१३) नियुक्तीच्या वेळी ५०० रुपयांच्या बॉन्ड पेपरावर विहित नमुन्यातील कंत्राट करार करुन संबंधीत आस्थापनेस सादर करणे आवश्यक राहील अन्यथा त्याची नियुक्ती रद्दबादल करण्यात येईल.

१४) मानसेवी तज्ञला कुठल्याही कारणास्तव पदधारकास पदाचा राजीनामा दयावयाचा असल्यास त्याने एक महिना आधी पुर्वसूचना देणे बंधनकारक आहे.

१५) पात्र उमेदवारांची नियुक्ती न झाल्यास त्यांची प्रतिक्षायादि तयार करुन सदर प्रतिक्षायादि दोन वर्षाच्या कालावधी करता ग्राह्या धरण्यात येईल व नियुक्त झालेला कंत्राटी मानसेवी तज्ञनी राजीनामा दिल्यास, सेवा सोडुन गेल्यास यादि मध्ये उपलब्ध असलेल्या पुढील उमेदवारास नियुक्त करण्यास येईल.

--सही--

**प्रमूख वैद्यकीय अधिकारी**

**सेठ ऐ .बी.जे.बृमपा. कान नाक घसा रुग्णालय**